# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

दूरध्वनी क्र.
२४०१०४३७/२४०२०७८१
Visit us at : http://mpcb.gov.in
Email : eb@mpcb.gov.in

"आपली सेवा आमचे कर्तव्य"

कल्पतरु पाँईंट, २ रा मजला,
शीव माटुंगा स्किम रोड क्र. ८
शीव सर्कलसमोर, शीव (पूर्व)
मुंबई - ४०० ०२२

---

जा.क्र.मप्रनि/ आस्था/ब- १३९८ दिनांक ०५/१२/२०२५

## **सूचना **

विषयः महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातील कनिष्ठ लघुलेखक या संवर्गाच्या पदभरती प्रक्रियेतील लेखी परीक्षेत पात्र ठरलेल्या उमेदवारांची व्यावसायिक चाचणी (Proficiency Test ) घेण्याबाबत

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातील कनिष्ठ लघुलेखक या संवर्गाच्या १४ पदांसाठी इन्स्टिटयुट ऑफ बँकींग पर्सोनेल सिलेक्शन (IBPS) या संस्थेमार्फत लेखी परीक्षा घेण्यात आलेली आहे. सदर परीक्षेचा निकाल मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेला असून, व्यावसायिक चाचणी परीक्षा घ्यावयाची आहे.

सदर परीक्षा घेण्यासाठी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे हे प्राधिकृत असून, सदर यंत्रणेमार्फत व्यावसायिक चाचणीच्या नियोजनाबाबत कार्यवाही सुरु आहे.

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रानिमं-१२२२/प्र.क्र.५४/का.१३-अ, दिनांक ०४ मे, २०२२ मधील तरतुदीनुसार कनिष्ठ लघुलेखक पदासाठीचे उमेदवार लेखी परीक्षेत किमान ४५% गुण प्राप्त करतील, अशा उमेदवारांची व्यावसायिक चाचणी (Proficiency Test ) घेणे आवश्यक आहे.

तरी सर्व पात्र उमेदवारांना कळविण्यात येते की, ज्या उमेदवारांनी मे. इन्स्टिटयुट ऑफ बँकींग पर्सोनेल सिलेक्शन (IBPS) या संस्थेकडे भरलेल्या अर्जानुसार इंग्रजी व मराठी अशा दोन्ही भाषेतील लघुलेखनाची प्रमाणपत्रे नमूद केलेली आहेत, अशा उमेदवारांनी त्यांना लघुलेखनाची व्यावसायिक चाचणी मराठी किंवा इंग्रजी यापैकी कोणत्या भाषेतून दयावयाची आहे, याबाबतचा पसंतीक्रम सादर करावयाचा आहे. सदर पसंतीक्रम aoeb@mpcb.gov.in या ई-मेलवर दिनांक १६/१२/२०२५ रोजी संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत पाठविण्यात यावा. यासोबत उमेदवाराने IBPS या संस्थेकडे भरलेला अर्ज व लघुलेखनाची प्रमाणपत्रे पाठवावीत.

**सदर पसंतीक्रम केवळ ज्या उमेदवारांनी मराठी व इंग्रजी अशी दोन्ही लघुलेखनाची प्रमाणपत्रे धारण केलेली आहेत, त्यांनीच दयावयाचा आहे.**

सदर माहिती विहीत मुदतीत प्राप्त न झाल्यास संबंधीत उमेदवारास लघुलेखन व्यावसायिक चाचणी देण्यास स्वारस्य नसल्याचे गृहीत धरण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

( प्रमोद नांदगावकर )
प्रशासकीय अधिकारी